मुंबई विद्यापीठ

क्र.आस्था.२(४)/EST/ICC/२०१२-१३/७

परिपत्रक :—

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, प्रभारी परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख, यांना कळविण्यात येते की, परिपत्रक क्रमांक आस्था. २(४) Est Icc/२०११—१२/७/२०१२ दिनांक १२ मार्च, २०१२ नुसार उच्च न्यालयाच्या आदेशाबाबत तातडीने कार्यवाही करून आपल्या विभागातील नागरीकांची सनद विहीत कालावधीत आपल्या विभागात दर्शनी/ ठळक जागी लावण्यात यावी व नागरीकांनी मागणी केल्यास उपलब्ध करून दयावी तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आस्थापना विभागास त्वरीत पाठविण्यात यावा असे आदेश देण्यात आले होते. परंतु अजून पर्यंत ब—याचशा कार्यालय प्रमुख/ विभाग प्रमुख यांनी त्याची अंमलबजावणी केलेली नाही असे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. तसेच सदरबाबत विधानसभा सदस्यानी अतांराकित प्रश्नाव्दारे विचारणा केली असुन "नागरीकांची सनद" दर्शनी भागी फलकावर न लावणा—या कार्यालय प्रमुखावर कार्यवाही करण्याबाबत प्रशासन गंभीरपणे विचार करत आहे. तरी हे परिपत्रक मिळताक्षणी ताबडतोब कार्यवाही करून अनुपालन अहवाल उलटटपाली आस्थापना विभागास त्वरित पाठवावा अन्यथा शासन आदेशानुसार कार्यालय प्रमुखावर/विभाग प्रमुखांवर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कुलसचिव

मुंबई —४०००३२.
२२ जून, २०१२.